# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 21/02/2021 (रविवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– दिनांक 20/02/2021 चे 18.30 वा. ते 19.00 वा. चे सुमारास एमएच– 31/सीक्यू– 2171 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरदाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकल चालक नामे– सुमीत अशोक सोमकुवर, वय 25 वर्ष, रा. लाडगाव याला धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तसेच मोटरसायकल चालक लिलाधरा रामचंद्र ढोक वय अंदाजे 65 वर्ष रा जामगाव व अरूण माहादेव बावणे वय 40 वर्ष रा कलंभा या दोघांना सुध्दा आरोपी ट्रक चालकाने धडक दिल्याने ते दोघेही अपघातामध्ये जखमी झाले आहे. त्यांना उपचारा करीता नागपुर येथे नेले आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पो हवा अरूण भेंडे, पोस्टे काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ), 337, 338 भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री राहुल बोंद्रे 9823904141 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. केळवद – दिनांक 18/02/2021 चे 23.30 वा. ते दिनांक 20/02/2021 चे 13.00 वा. चे सुमारास पो.स्टे. केळवद हद्दीत फिर्यादीयांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राठोड 8605585606 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 28 कि. मी. मौजा सांभारे खदान उटी येथे संतोष महेंद्र सिंह (मृतक) वय 21 वर्ष रा. ग्राम भंडार ता. धुरकी जि.गढवा (झारखंड) ह.मु.दिलीप सवारे गीटीखदानचे सर्विस क्वॉटर ता.कुही जि.नागपुर हा दि. 19/02/2021 रोजी 20:00 ते दि. 20/02/2021 चे सकाळी 09:30 वा. पर्यंत दिलीप संभारे याचे क्रेशर मशीन गिटीखदान मध्ये मजुरीचे काम करीत होता. तो कन्व्हर बेल्ट पाहण्याकरीता गेला असता तो बेल्ट चालु असतांना त्याचे गळयातील दुपटा त्या बेल्ट मध्ये फसल्याने तो मशीनमध्ये ओढत गेल्याने त्याचे शरीराचे उजव्या भागावर गंभीर मार लागुन तो जखमी झाला. त्यास उपचाराकामी प्रथम प्रशांत दवाखाना कामठी व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन दि. 20/02/2021 चे 01:28 वा. मृत घोषीत केले. सदर मर्गचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बाबुलाल कुमार जितनसींह, वय 20 वर्ष, रा.ग्राम भंडार ता.धुरकी जि.गढवा (झारखंड) ह.मु.दिलीप सवारे गीटीखदानचे सर्विस क्वॉटर ता.कुही जि.नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोनि श्री चंद्रकान्त मदने हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर